# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | |
|---|---|---|
| **मुख्यमंत्री** | : | सन २०११ च्या प्रथम अधिवेशनातील सन २०११-२०१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देतांना दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री.** शिरीष चौधरी, शिरीष कोतवाल, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मोर्शी वरूड तालुक्यातील कृषी पंपाच्या जोडणीकरीता एकूण माहे जानेवारी २०१३ पर्यंत अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १८२० असणे, त्यापैकी वीज जोडणी दिलेल्या अर्जदारांची संख्या ७८४ असणे, पैकी माहे मार्च, २०१२ पर्यंत शुल्क भरून जोडणी प्रलंबित असलेल्या अर्जदारांची संख्या २८९ असणे, काम सुरू असलेला १५२ अर्जदारांपैकी ९८ अर्जदारांकरिता वीज वाहिनी तयार नसणे, प्रलंबित १३७ अर्जदारांची काम करण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरू करण्यास विलंब करणे, माहे मार्च २०१२ नंतर शुल्क भरलेल्या ११३६ प्रलंबित अर्जदारांचे कृषी पंप देणेबाबत नियोजन नसणे, शेतकऱ्यांनी वर्षापूर्ती पैसे भरूनही पंपापासून वंचित ठेवल्यामुळे सिंचन होऊ न शकणे, सिंचनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ न होणे, विशेष घटक योजनेमार्फत मागासवर्गीय शेतकऱ्यांचे विहिरींवर वीज पुरवठा करण्याकरिता कृषी विभागाने शुल्क भरूनही कृषी विभागाने दिलेल्या २०६ अर्जदारांना वीज पुरवठा न करणे, त्यांच्या वीज जोडणीकरिता वाहिनी उभारण्याचे काम न करणे, समाज कल्याण विभागाचे निधी देण्याचे पाठपुरावा असल्याचे सबब देणे, मागासवर्गीय शेतकऱ्यांना कृषी पंपाच्या जोडणीपासून वंचित ठेवणे, त्यामुळे मागासवर्गीय शेतकरी सिंचन करू न शकल्यामुळे आर्थिकदृष्ट्या अधोगतीला जाणे, शेतकऱ्यांनी वर्षापूर्वी पैसे भरूनही पंपापासून

वंचित ठेवल्यामुळे सिंचन होऊ न शकणे, सिंचनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ न होणे, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत विद्युत जोडणीकरीता प्रलंबित अर्जदारांची संख्या १०५८ असणे, वारंवार निविदा काढूनही निविदा प्रक्रिया पूर्ण न करणे, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेची कार्यवाही न झाल्यामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील घरांमध्ये अजूनही विद्युत पुरवठा नसणे, झोपडपट्टीतील बीपीएल कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, अंधारामुळे त्यांच्या जीवितास धोका कायम असणे, विद्युततारांच्या घर्षणामुळे लागलेल्या आगीमुळे आमपेंड, इत्तमगाव, पवणी (ता.वरूड) येथील शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई न मिळणे, मोर्शी, वरूड तालुक्यातील खेड व अंबाडा परिसरातील कृषी पंपांना कमी दाबाने वीज पुरवठा केल्यामुळे संत्रापीक वाळणे, रब्बी पिकांचे नुकसान होणे, महावितरणाच्या प्रलंबित कृषी पंपाची वीज जोडणी, मागासवर्गीयांची प्रलंबित वीज जोडणी व शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे नुकसान भरपाई न देणे, कमी दाबाची वीज दिल्यामुळे शेतकरी व जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष, त्यावर करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री गणपत गायकवाड,** जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, लक्ष्मण जगताप, विलास लांडे, कृषिभूषण साहेबराव पाटील, योगेश सागर, सुभाष देसाई, महादेव बाबर, प्रकाश (बाळा) सावंत, विजय वडेट्टीवार, प्रकाश भोईर, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री शिरीष चौधरी, किसन कथोरे, विनोद घोसाळकर, जयकुमार गोरे, सुरेश जेथलिया, बच्चु कडू, एकनाथराव खडसे (पाटील), प्रकाश शेंडगे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विनाअनुदानित विद्यालये व महाविद्यालयातील शिक्षकांनी १२ वी च्या उत्तरपत्रिका तपासणीवर तसेच पदवीधर विद्यार्थ्यांच्या परीक्षा व प्रात्यक्षिकावर बहिष्कार टाकलेला असणे, बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स युनियन (बुक्टू) या मुंबईतील प्राध्यापकांच्या संघटनेने एमफुक्टो या राज्यस्तरीय शिक्षक संघटनेच्या बरोबरीने वेतनविषयक मागण्या पूर्ण झाल्याशिवाय विद्यापीठाच्या परीक्षेच्या कामामध्ये सहभागी न होण्याचे ठरविले असणे, प्राध्यापकांच्या मागण्यांवर शासन गंभीर नसल्याने विद्यार्थी हवालदिल होणे, कनिष्ठ तसेच पदवी महाविद्यालयाच्या शिक्षकांनी मागण्यांसाठी बोर्डाच्या उत्तरपत्रिका न तपासण्याचा निर्णय घेतला असणे, पदवी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला असणे, त्यामुळे विद्यार्थी व पालक चिंतीत होणे, शिक्षक संघाची शिक्षणमंत्र्यांबरोबरची दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजीची बैठक निष्फळ ठरली असणे, शिक्षकांच्या कठोर भूमिकेमुळे लाखो विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे लाखो विद्यार्थी व पालक यांचेमध्ये शासनाविरूध्दचा असलेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, उपाययोजना व शासनाच्या प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री गोपाळ शेट्टी,** योगेश सागर, अमीन पटेल, बाबा सिद्धीकी, डॉ.नामदेव उसेंडी, श्री.जगन्नाथ शेट्टी, ॲड.यशोमती ठाकूर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **बंदरे मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील वाहतुक कोंडीवर मात करण्यासाठी जलवाहतुकीला प्राधान्य देण्याचा राज्य शासनाचा निर्णय अद्याप न होणे, नरीमन पॉईंट ते बोरीवली हा प्रवास करण्यासाठी

वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी तसेच सदरहू प्रकल्प राबविण्यासाठी एमएमआरडीएवर जबाबदारी सोपविण्यात येणे, परंतु एमएमआरडीएमार्फत नरीमन पॉईट, वांद्रे, जुहू, वर्सोवा, बोरीवली या ठिकाणी धक्के बांधण्यात येणार असल्याचे समजणे, त्यामुळे शासन सदरहू प्रकरणी कोणता निर्णय घेत आहे याची माहिती तातडीने उपलब्ध होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : लक्षवेधी सुचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-**

**दुग्धविकास मंत्री** : **"मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व), आरे दुग्धवसाहत येथील आदिवासी पाडे हे मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असणे."** या विषयावरील सर्वश्री रविंद्र वायकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २५ मार्च, २०१० रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**आठ : अल्पकालीन चर्चा - (म.वि.स. नियम १०१ अन्वये) -**

**(दिनांक २१ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अल्पकालीन चर्चेची सूचना)**

**सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, नाना पटोले, प्रा. राम शिंदे, श्री. एकनाथराव खडसे (पाटील), डॉ. संजय कुटे, श्री. गोवर्धन शर्मा, डॉ. खुशाल बोपचे, श्री. सुभाष देसाई, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ रोजी भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील मुरमाडी येथे तीन अल्पवयीन बहिणींवर बलात्कार होऊन त्यांची हत्या करण्यात आल्याची भीषण घटना घडणे, माणुसकीला कालिमा फासणाऱ्या या अमानवीय घटनेमुळे भंडारा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळणे, या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलीसांना अद्याप यश आलेले नसणे, शासनाच्या वतीने नऊ पोलिस पथकांची नियुक्ती करण्यात येणे, तथापि सदरची घटना घडून २६ दिवसांचा कालावधी उलटूनही खरे आरोपी अद्यापही मोकाटच असणे, आरोपींचा त्वरित शोध घेण्याकरिता व त्यांना कठोर शिक्षा होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणे, या घटनेच्या निषेधार्थ मशाल मोर्चाही काढण्यात येणे, या घटनेबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने राज्य शासनाला अहवाल सादर करण्यासाठी नोटीस दिली असणे, या घटनेबाबत अलिकडेच प्राप्त झालेल्या शवविच्छेदन व फॉरेन्सिक अहवालात उघडकीस आलेली मतभिन्नता, शासनाने सदर घटनेचा तपास तात्काळ सीबीआयमार्फत करण्याची आवश्यकता व मुलींच्या आईला आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे दलित महिलेचे अपहरण करुन तिच्यावर अमानुष

अत्याचार करणे, आरोपी दानीश शेख व अमन शेख हे उपनगराध्यक्षांचे पुतणे असणे, पोलिसांनी तब्बल चार दिवस गुन्हा नोंद न करणे व अतिरिक्त पोलिस अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतरच आरोपींना अटक होणे, सदर आरोपी संघटित गुन्हेगारी टोळी चालवित असल्यामुळे त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याप्रमाणे कारवाई होण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे कुही, जि.नागपूर येथे आदिवासी समाजाच्या घरावर दरोडा टाकून मुलीवर केलेल्या बलात्काराची नुकतीच घडलेली घटना, श्रीरामपूर व कुही येथील पीडित कुटुंबांनाही शासनाकडून कोणतीही मदत न मिळणे, एकूणच राज्यातील दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय महिलांवर वाढत असलेले अत्याचाराचे प्रमाण, त्यांच्या होणाऱ्या हत्येच्या घटना व या घटनांमधील आरोपींना अटक करण्यात शासनाला येत असलेले अपयश, दलित व आदिवासी समाजामध्ये याबाबत पसरत असलेला प्रचंड असंतोष, आरोपींना त्वरित अटक करण्याची व पीडितांना तातडीने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता."

**नऊ : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ -**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), सुधीर मुनगंटीवार, महादेव बाबर, चंद्रशेखर बावनकुळे, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, सुरेश हाळवणकर, अबू आजमी, प्रकाश शेंडगे, रविंद्र वायकर, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, भरतशेठ गोगावले, सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, शरद पाटील, राजेश क्षीरसागर, चंद्रदिप नरके, डॉ.सुजित मिणचेकर, श्री.चिमणराव पाटील, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, सर्वश्री चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, अनिल कदम, धनराज महाले, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री विजयराज शिंदे, संतोष सांबरे, संजय (बंडू) जाधव, आर.एम.वाणी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, दादाराव केचे, अतुल देशकर, विजयकुमार देशमुख, संजय राठोड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.सुधाकर भालेराव, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, प्रा.राम शिंदे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २२० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री भिमराव तापकीर, संजय भेगडे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.